**L. A. BILL No. XXV OF 2021.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA CO-OPERATIVE SOCIETIES ACT, 1960.

**सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५.**

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९६१ चा महा. २४.

२०२१ चा महा. अध्या. ९.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २ नोव्हेंबर २०२१ रोजी, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, २०२१, प्रख्यापित केला होता ;

(शा.म.मु.) एचबी–१५४३–१ (८४५-१२-२०२१)

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या बाहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२१, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २ नोव्हेंबर २०२१ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ याच्या कलम ७३अअअ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (यात यापुढे ज्याचा निर्देश, ''मुख्य अधिनियम'' असा केला आहे) याच्या कलम ७३अअअ मध्ये, पोट-कलम (३) मधील,— (१९६१ चा महा. २४.)

(एक) विद्यमान परंतुकापूर्वी, पुढील परंतुक समाविष्ट करण्यात येईल आणि ते, २४ मार्च २०२० पासून समाविष्ट करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :—

" परंतु, जर समितीच्या निवडून आलेल्या सदस्यांचा व तिच्या पदाधिकाऱ्यांचा पदावधी समाप्त झाला असेल तर, आणि जर संस्थेच्या समितीची निवडणूक, कोविड-१९ वैश्विक साथरोगाची परिस्थिती विचारात घेऊन राज्यामध्ये टाळेबंदी लादल्यामुळे, राज्य शासनाने वेळोवेळी काढलेल्या आदेशांमुळे किंवा संस्थेच्या समितीच्या सदस्यांना जबाबदार धरता येणार नाही अशा कोणत्याही कारणामुळे घेतली जाऊ शकली नसेल तर, समितीचे असे सदस्य आणि पदाधिकारी, नवीन समिती यथोचितरित्या घटित होईपर्यंत, समितीचे सदस्य आणि पदाधिकारी म्हणून नियमितपणे असल्याचे मानण्यात येईल :";

(दोन) विद्यमान परंतुकामध्ये, " परंतु " या मजकुराऐवजी ''परंतु आणखी असे की'' हा मजकूर दाखल करण्यात येईल.

विधिग्राह्यीकरण व व्यावृत्ती.

**३.** मुख्य अधिनियमात किंवा कोणत्याही न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यांमध्ये एतद्‌विरुद्ध काहीही अंतर्भूत असले तरीही, समितीने किंवा समितीच्या सदस्यांनी किंवा तिच्या पदाधिकाऱ्यांनी, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींन्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये किंवा काढलेल्या आदेशांन्वये किंवा उप-विधिंन्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा हाती घेतलेली कोणतीही कारवाई किंवा काढलेला कोणताही आदेश, महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२१ द्वारे सुधारणा केल्याप्रमाणे, कलम ७३अअअ च्या पोट-कलम (३) मधील पहिल्या परंतुकाच्या तरतुदी, जणू काही सर्व महत्त्वाच्या वेळी निरंतरपणे अंमलात होत्या असे समजून, कायद्यानुसार, विधिग्राह्यपणे केलेली गोष्ट, हाती घेतलेली कारवाई, किंवा, यथास्थिति, काढलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल. (२०२१ चा महा. .)

सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ याचे निरसन व व्यावृत्ती.

**४.** (१) महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, २०२१ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. (२०२१ चा महा. अध्या. ९.)

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या, मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

कोविड-१९ वैश्विक साथरोगाचा फैलाव झाल्यामुळे देशामध्ये टाळेबंदी (लॉकडाउन) घोषित केल्यामुळे, २४ मार्च २०२० पासून राज्यातील सामाजिक व आर्थिक कार्यांची गती मंदावलेली आहे. टाळेबंदीमुळे राज्यातील सहकारी संस्थांच्या कामकाजावर देखील प्रतिकूल परिणाम झालेला आहे आणि म्हणून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (१९६१ चा महा. २४) व त्याखाली केलेले नियम यात तरतूद केल्याप्रमाणे, सहकारी संस्थांच्या समित्यांच्या निवडणुका विनिर्दिष्ट कालमर्यादेत घेणे शक्य झाले नव्हते. म्हणून महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०२० (२०२० चा महा. अध्या. १२) याद्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम ७३कब च्या पोट-कलम (१५) मध्ये तिसरे परंतुक समाविष्ट केले असून त्यात, उक्त अध्यादेशाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी ज्या संस्थांच्या समितीच्या निवडणुका घ्यावयाचे नियत होते, परंतु ज्यांच्या निवडणुका घेण्यात आल्या नाहीत अशा संस्थांच्या समित्यांच्या निवडणुका घेण्याची कालमर्यादा वाढविण्याची तरतूद केली आहे.

२. उक्त अधिनियमाच्या कलम ७३अअअ च्या पोट-कलम (३) मध्ये अशी तरतूद आहे की, समितीचा पदावधी समाप्त झाल्यावर, अशा समितीच्या सदस्यांनी, समितीचे सदस्य म्हणून त्यांची पदे रिक्त केली असल्याचे मानण्यात येईल. उक्त अध्यादेशाद्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम ७३अअअ च्या पोट-कलम (३) मध्ये परंतुक जादा दाखल केले असून, त्यात अशी तरतूद केली आहे की, जर संस्थेच्या समितीची निवडणूक, संस्थेच्या समितीचे सदस्य जबाबदार नसतील अशा कोणत्याही कारणासाठी घेतली जाऊ शकत नसेल तर समितीचे विद्यमान सदस्य, नवीन समिती यथोचितरित्या घटित होईपर्यंत, नियमितपणे असल्याचे मानण्यात येईल. उक्त अध्यादेश सन २०२० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ मध्ये रुपांतरित झाला आहे.

उक्त अधिनियमाच्या कलम ७३अअअ च्या पोट-कलम (३) चे उक्त परंतुक, उक्त अध्यादेश, **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून, म्हणजेच १० जुलै २०२० पासून अंमलात आला आहे. ही बाब लक्षात घेता, ज्यांचा पदावधी १० जुलै २०२० रोजी किंवा त्यानंतर समाप्त झालेला आहे अशा समितीच्या सदस्यांना व तिच्या पदाधिकाऱ्यांना, नवीन समिती यथोचितरित्या घटित होईपर्यंत सदस्य म्हणून नियमितपणे असण्याचे संरक्षण मिळू शकेल. तथापि, समितीच्या ज्या सदस्यांचा व तिच्या पदाधिकाऱ्यांचा पदावधी १० जुलै २०२० च्या पूर्वीच समाप्त झालेला आहे त्या सदस्यांना व पदाधिकाऱ्यांना नवीन समिती यथोचितरित्या घटित होईपर्यंत सदस्य म्हणून नियमितपणे असण्याचे संरक्षण मिळू शकत नाही.

तसेच, उक्त अधिनियमाच्या कलम ७३आय तसेच कलम ७७अ यांच्या तरतुदींनुसार, जेव्हा समितीचा किंवा तिच्या सदस्यांचा पदावधी समाप्त झाला असेल अशा बाबतीत, निबंधकास, एकतर स्वतःहून किंवा समितीच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा सदस्याच्या अर्जावरून, नवीन समिती घटित होईपर्यंत, संस्थेचे कामकाज चालविण्यासाठी संस्थेचे तीनपेक्षा अधिक नसतील इतके सदस्य यांचा समावेश असणारी समिती अथवा एक किंवा त्याहून अधिक प्राधिकृत अधिकारी, यांची नियुक्ती करता येईल.

अशा संस्थांची संख्या प्रचंड असल्याने, अशा संस्थांचे कामकाज चालविण्यासाठी प्राधिकृत अधिकारी नियुक्त करणे व्यवहारिकदृष्ट्या शक्य नव्हते आणि ते सहकार क्षेत्राच्या हिताचे देखील नव्हते. अशाप्रकरणी, प्राधिकृत अधिकारी नेमण्याच्या कारवाईमुळे न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवू शकली असती.

३. म्हणून, कोविड-१९ वैश्विक साथरोगामुळे राज्यात पहिली टाळेबंदी लादण्यात आल्याच्या २४ मार्च २०२० या तारखेपासून, उक्त अधिनियमाच्या कलम ७३अअअ च्या पोट-कलम (३) च्या विद्यमान परंतुकापूर्वी, परंतुक समाविष्ट करून, त्याद्वारे अशी तरतूद करणे इष्ट वाटले की, जर समितीच्या निवडून आलेल्या सदस्यांचा व तिच्या पदाधिकाऱ्यांचा पदावधी समाप्त झाला असेल तर, आणि जर संस्थेच्या समितीची निवडणूक, कोविड-१९ वैश्विक साथरोगाची परिस्थिती विचारात घेऊन राज्यामध्ये टाळेबंदी लादल्यामुळे, राज्य शासनाने वेळोवेळी काढलेल्या

आदेशांमुळे किंवा संस्थेच्या समितीच्या सदस्यांना जबाबदार धरता येणार नाही अशा कोणत्याही कारणामुळे घेतली जाऊ शकली नसेल तर, समितीचे असे सदस्य आणि पदाधिकारी, नवीन समिती यथोचितरित्या घटित होईपर्यंत, समितीचे सदस्य आणि पदाधिकारी म्हणून नियमितपणे असल्याचे मानण्यात येईल.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, म्हणून, त्यांनी दिनांक २ नोव्हेंबर २०२१ रोजी महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) अध्यादेश, २०२१ प्रख्यापित केला होता.

५. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १२ नोव्हेंबर २०२१.

**बाळासाहेब पाटील,**
सहकार मंत्री.

## सन २०२१ चे वि.स. विधेयक क्रमांक २५—महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२१.

**(महाराष्ट्र सहकारी संस्था सुधारणा अधिनियम, १९६० यातील उतारे)**
**(सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४)**

**१.** ते **७३क.** ** ** ** ** ** **

**७३ककक.** (१) व (२) ** ** ** ** ** ** समितीची रचना करणे.

(३) समितीच्या निवडून आलेल्या सदस्यांचा आणि तिच्या पदाधिकाऱ्यांचा पदावधी, निवडणुकीच्या दिनांकापासून पाच वर्षांपर्यंत असेल आणि पदाधिकाऱ्यांची मुदत समितीच्या मुदतीइतकीच असेल आणि समितीची मुदत समाप्त झाल्यावर, सदस्यांनी समितीचे सदस्य म्हणून आपली अधिकार पदे रिक्त केली असल्याचे मानण्यात येईल.

"परंतु, जर संस्थेच्या समितीची निवडणूक, संस्थेच्या समितीच्या सदस्यांना जबाबदार धरता येणार नाही अशा कोणत्याही कारणांसाठी घेतली जाऊ शकत नसेल तर, समितीचे विद्यमान सदस्य, नवीन समिती यथोचितरित्या घटित होईपर्यंत, नियमितपणे सदस्य असल्याचे मानण्यात येईल.".

(४) ते (५) ** ** ** ** ** **

**७३(ख).** ते **(आय).** ** ** ** ** ** **

**७४.** ते **१६८.** ** ** ** ** ** **

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२१ चे विधानसभा विधेयक क्रमांक २५.]**

**[ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक. ]**

**[श्री. बाळासाहेब पाटील,**
सहकार मंत्री.]

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई